**Series ΨYZXW/C**

**Set-4**

**प्रश्न-पत्र कोड**
**Q.P. Code** **8**

रोल नं.
Roll No.

परीक्षार्थी प्रश्न-पत्र कोड को उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर अवश्य लिखें ।
Candidates must write the Q.P. Code on the title page of the answer-book.

# मराठी
# MARATHI

*वेळ : **3** तास* | *गुण : **80***

*निर्धारित समय : **3** घण्टे* | *अधिकतम अंक : **80***

*Time allowed : **3** hours* | *Maximum Marks : **80***

- प्रश्न-पत्रिकेत **15** छापील पाने आहेत; कृपया तपासून घ्या.
- प्रश्न-पत्रिकेच्या उजवीकडे छापलेला कोड नंबर उत्तर-पुस्तिकेच्या मुख-पृष्ठावर लिहा.
- प्रश्न-पत्रिकेत **9** प्रश्न आहेत; तपासून घ्या.
- **उत्तरे लिहताना प्रश्न क्रमांक अवश्य लिहा.**
- प्रश्न-पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटे देण्यात आली आहेत. प्रश्न-पत्रिका 10.15 वाजता वाटण्यात येईल. 10.15 ते 10.30 या दरम्यान प्रश्न-पत्रिका फक्त वाचायची आहे; उत्तरे लिहायला सुरुवात करु नये.

- Please check that this question paper contains **15** printed pages.
- Q.P. Code given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains **9** questions.
- **Please write down the serial number of the question in the answer-book before attempting it.**
- 15 minute time has been allotted to read this question paper. The question paper will be distributed at 10.15 a.m. From 10.15 a.m. to 10.30 a.m., the students will read the question paper only and will not write any answer on the answer-book during this period.

**General Instructions :**

*(i)* *Question paper is divided into **two** sections.*

*(ii)* *It has total **9** questions.*

*(iii)* ***Section A : 5** Questions No. **1** to **5**.*

*(iv)* ***Section B : 4** Questions No. **6** to **9**.*

*(v)* *Attempt questions as per specific instructions.*

*(vi)* *Write questions no. in answer book before attempting it.*

## SECTION A

**1.** खालील उतारा वाचून प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही पाच) *5*

मानवी जीवन हे एखाद्या जलाशयासारखे आहे. वरवर शांत दिसणाऱ्या जलाशयात लहान लहान माशांच्या मुक्या बिलोल हालचाली असतात. जवळ जाऊन पाहिल्यावर त्यातील सौंदर्य कळते. तसेच मानवी जीवनाचे आहे. हे जीवन जगण्यातच मौज आहे. आपल्या जीवनात वाटतो किंवा भासतो तितका एक सूर, एक रंग नाही. मनुष्य आहे, मन आहे, तिथे संकेताखाली दबलेल्या जीवनात सुद्धा निरनिराळया तऱ्हेचे श्वसन ऐकू येते. आपल्याला असे जीवन वाट्याला आले असते तर बरे झाले असते, अशी खंत करण्यापेक्षा नियतीने जो जीवन आपल्याला दिले आहे तेच जगण्यात मौज आहे. निसर्गाचाच एक भाग म्हणजे माणूस. हा निसर्ग सतत गाणे गात असतो. कधी निसर्गाचे गाणे झरे, नद्या गातात. कधी पक्षी गातात. कधी उमलणारी फुले हे गाणे माना वेळावून गातात. सूर्याचे किरण सूर्यगीत गात असतात. माणूस ह्या सगळ्या गीतांची शिदोरी आपल्या जवळ जमा करीत असतो. तो थांबत नसतो. जो थांबतो तो संपतो. यालाच जीवन असे नाव आहे. जीवनात सतत सुखाचा पाऊस पडणार नाही हे खरे, पण सर्वांना गार वाऱ्याच्या चार झुळका तरी मिळतील ! कृष्णाने कुंतीला वर मागायला सांगितले, तेव्हा त्या वीर मातेने उत्तर दिले, "देवा देणारच तर एक वर दे ! आमच्यावर नेहमी संकटे येऊ देत !"

किती विचित्र मागणे हे ! उपभोगाच्या आणि संकुचित जीवनाच्या दृष्टीने विचित्र खरे ! पण आत्मविकासाच्या आणि पराक्रमाच्या दृष्टीने मनुष्याला देवापाशी दुसरे काय मागता येईल ? मनुष्यातला देव प्रकट होतो तो परांच्या गाद्यांवर लोळून नाही तर काट्याकाट्यातून धावत जाऊन !

(i) मानवी जीवनाची तुलना कोणाशी केली आहे ?

(a) लहान मासे (b) जलाशय

(c) नितळ पाणी (d) निसर्ग

(ii) आपले जीवन कसे आहे ?

(a) एकसूरी (b) एकरंगी

(c) अनेकरंगी (d) बहुसुरी

(iii) खरी मौज कशात आहे ?

(a) सुखी जीवन जगण्यात (b) जे नियती ने दिले ते जगण्यात

(c) चैनीत जगण्यात (d) कंटाळा करीत जगण्यात

(iv) निसर्ग सतत काय करत असतो ?

(a) बदलत असतो (b) गाणेगात असतो

(c) थांबत असतो (d) स्थिर असतो

(v) माणूस हा ____________भाग आहे.

(a) परमेश्वराचा (b) कुटुंबाचा

(c) निसर्गाचा (d) यंत्राचा

(vi) कुंतीने श्रीकृष्णाकडे कोणता वर मागितला ?

(a) आमच्यावर संकटे येऊ नयेत

(b) आमच्यावर नेहमी संकटे येऊ देत

(c) आमच्यावरील संकटे दूर जाऊ देत

(d) आमची संकटे इतरांवर जाऊ देत

(vii) मनुष्यातला देव केव्हा प्रकट होतो ?

(a) देवाची पूजा केल्याने

(b) परांच्या गाद्यांवर लोकल्याने

(c) काट्याकाट्यातून धावत गेल्याने

(d) उपास तापास केल्याने

**2.** खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचा योग्य पर्याय निवडा. (कोणतेही पाच) *5*

निसर्गाचे वेड किती विलक्षण असते. निसर्ग सान्निध्य हवे हवे से वाटते. निसर्गातल्या प्रत्येक गोष्टीतून एक अपूर्व साक्षात्कार होतो. आजच्या या यांत्रिक युगात आपण ही सर्वजण अशा शांतते साठी तळमळत असतो. पण शहरातील वाढत्या उद्योगधंद्यांमुळे आपण हा एकांत हरवून बसलो आहोत. शहरांना कंटाळून चार दिवस खेडेगावात जायचे म्हटले तर तेथेही सारे उजाड आणि रखरखीत झाले आहे. माणसांनी आपल्या उपजीविके साठी बेसुमार जंगलतोड केली आहे. त्यामुळे निसर्गाचा तोलच ढासळला आहे. वृक्षांमुळे हवेचे प्रदूषण थांबते. वृक्षांची सळसळ उबगलेले मन शांत करते. दुतर्फा असलेली झाडे रस्त्याची शोभा वाढवितात. वृक्ष आणि पाऊस यांचा तर अतूट संबंध आहे. जंगलतोड झाल्या पासून वृक्षांचा जिवलग सखा पाऊस रूसला, दडी मारुन बसला आहे. झाडे भरपूर प्रमाणात लावल्याशिवाय रूसलेला हा पाऊस प्रसन्न होणार नाही आणि दुष्काळाच्या संकटावर आपण मात करू शकणार नाही.

वृक्षांचे आणि आपले अतूट नाते आहे. या वृक्षांनी आपल्याला विविध प्रकारची औषधे दिली. घरांना लाकूड दिले. अन्नाला अग्नी दिला. उबगलेल्या मनाला शांतीसाठी सावली दिली. अंत्यसंस्कारासाठी लाकूड दिले. जे स्वतःजवळ होते ते सात्विक पुरुषाप्रमाणे दिले. वृक्षांची आपल्या परीने जोपासना केली पाहिजे. मी जगलो नाही तरी चालेल पण माझे प्रतीक म्हणून एक वृक्ष तरी मी लावीनच ही प्रतिज्ञा जेव्हा आपण करू तेव्हाच मानवी जीवनाला चैतन्य लाभेल आणि वृक्षवल्ली आम्हाला सोयरे होतील.

(i) लेखकाला कोणती गोष्ट विलक्षण वाटते ?

(a) निसर्ग सान्निध्य (b) शांतता

(c) निसर्गाचे वेड (d) निसर्गाचे रौद्र रूप

(ii) लेखकाच्या मते यांत्रिक युगातील माणूस कशासाठी तळमळत असतो ?

(a) पैशासाठी (b) शांततेसाठी

(c) सुखासाठी (d) यंत्रासाठी

(iii) आजची खेडी कशी आहेत ?

(a) शांत व हिरवीगार (b) उजाड व रखरखीत

(c) प्रगत व शांत (d) ओसाड

(iv) वृक्षांमूळे हवेचे प्रदूषण ______

(a) वाढते (b) दुप्पट होते

(c) थांबते (d) रुंदावते

(v) वृक्षांचा जिवलग सखा कोण आहे ?

(a) माणूस (b) निसर्ग

(c) पाऊस (d) पानगळ

(vi) वृक्षांची तुलना कोणाशी केली आहे ?

(a) देवाशी (b) पावसाशी

(c) सात्विक पुरुषाशी (d) निसर्गाशी

(vii) प्रत्येकाने कोणती प्रतिज्ञा केली पाहिजे ?

(a) एक वृक्ष तरी लावेनच

(b) रोज झाडांना पाणी घालेन

(c) मानवी जीवनाला चैतन्य देईन.

(d) रोज एक फळ खाईन

**3.** सूचनेनुसार लिहा. *4*

I. सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही चार)

(i) तू उत्तम नागरिक आहेस. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(a) सर्वनाम (b) विशेषण

(c) नाम (d) विशेषनाम

(ii) मराठी माणसाचा ऊर अभिमानाने भरून आला. (क्रियाविशेषण ओळखा)

(a) मराठी (b) भरून आला

(c) अभिमानाने (d) आला

(iii) चांगली माणसे सर्वांना मदत करतात. (क्रियापद ओळखा)

(a) चांगली (b) सर्वांना

(c) मदत करतात (d) माणसे

(iv) नीता आई बरोबर गेली. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(a) केवल प्रयोगी अव्यय (b) सर्वनाम

(c) शब्दयोगी अव्यय (d) विशेषनाम

(v) नितीन माझ्या शेजारी रहातो. (अधोरेखित शब्दाची जात ओळखा)

(a) सर्वनाम (b) विशेषण

(c) विशेषनाम (d) क्रियापद

II. सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही तीन) *3*

(i) आजीने रात्री गोष्ट सांगितली. (काळ ओळखा)

(a) वर्तमानकाळ (b) भविष्यकाळ

(c) भूतकाळ (d) रीती भूतकाळ

(ii) सविता कपडे छान शिवते. (काळ ओळखा)

(a) भूतकाळ (b) वर्तमानकाळ

(c) भविष्यकाळ (d) रीती भविष्यकाळ

(iii) खालीलपैकी कोणते वाक्य भविष्यकाळातील आहे.

(a) वेलीवर फुले उमलतील

(b) वेलीवर फुले उमलतात

(c) वेलीवर फुले उमलली होती

(d) वेलीवर फुले उमलत असतात

(iv) व्यायाम केल्यामुळे आरोग्य सुधारते. (या वाक्याचे भूतकाळातील वाक्य निवडा)

(a) व्यायाम केल्यामुळे आरोग्य सुधारते.

(b) व्यायाम केल्यामुळे आरोग्य सुधारते आहे.

(c) व्यायामामुळे आरोग्य सुधारले होते.

(d) व्यायाम केल्यामुळे आरोग्य सुधारणार नाही.

III. सूचनेनुसार योग्य पर्याय निवडा. (कोणतेही तीन) *3*

(i) मुलांनो, पुस्तके जपून वापरा. (वाक्याचा प्रकार ओळखा)

(a) उद्गारवाचक (b) आज्ञार्थी

(c) प्रश्नार्थक (d) संयुक्त

(ii) राणीला परिक्षेत यश मिळाले. (योग्य नकारार्थी वाक्य निवडा)

(a) राणीला परिक्षेत अपयश मिळाले.

(b) राणीला परिक्षेत यश मिळाले नाही.

(c) राणीला परिक्षेत अपयश मिळाले नाही.

(d) राणीला परिक्षेत यश मिळेल.

(iii) उमेश गावी गेला का ? (वाक्यचा प्रकार ओळखा)

(a) उद्‌गारवाचक (b) आज्ञार्थी
(c) प्रश्नार्थक (d) संबोधी

(iv) अरे वा ! छान भाषण केलेस ! (या वाक्याचे विधानार्थी वाक्य कोणते ?)

(a) तू खूप छान भाषण केलेस.
(b) तू केलेस का छान भाषण ?
(c) तू छान भाषण कर.
(d) तू छान भाषण करशील ?

IV. समानार्थी शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन) *2*

(i) उत्कंठा

(a) उत्सुकता (b) कंठापर्यंत
(c) आकंठ (d) खटाटोप

(ii) खग

(a) दुष्ट (b) पक्षी
(c) पंख (d) खट्याळ

(iii) अभिलाषा

(a) इच्छा (b) अभिमान
(c) निराशा (d) कुंठा

V. विरुद्धार्थी शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन) *2*

(i) आदर

(a) अपमान (b) अनादर
(c) दरवाढ (d) दररोज

(ii) सामान्य

(a) क्षुलुक (b) अमान्य
(c) असामान्य (d) विपरीत

(iii) परिचित

(a) प्रसिद्ध (b) ओळखीचा
(c) अपरिचिता (d) गाजलेला

VI. खालील शब्दांचे लिंग बदल करा व उत्तरांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन) *2*

(i) विदुषी

(a) वैदिक

(b) विद्वान

(c) विदूषक

(d) विद्वत

(ii) लेखक

(a) कवयित्री

(b) लेखिका

(c) लेखनिक

(d) कारकून

(iii) घोडा

(a) घोडीण

(b) घोडकी

(c) घोडी

(d) घोड्या

VII. खालील शब्दांचे वचन बदल करा व उत्तरासाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन) *2*

(i) वही

(a) वहीणी

(b) विहिणी

(c) वह्या

(d) वहे

(ii) वहाण

(a) वहाणा

(b) वाहणे

(c) वहाणे

(d) वहाणी

(iii) फुली

(a) फुले

(b) फुलक्या

(c) फुल्या

(d) फुला

VIII. खालील सामासिक शब्दांचा समास ओळखा व उत्तरांसाठी योग्य पर्याय निवडा. (कोणतेही दोन) *2*

(i) अंथरूण पांघरूण

(a) द्विगू

(b) अव्ययीभाव

(c) समाहार द्वंद्व

(d) इतरेतर द्वंद्व

(ii) आजन्म

(a) अव्ययीभाव

(b) इतरेतर द्वंद्व

(c) द्विगू

(d) तत्पुरुष

(iii) नवरात्र

(a) वैकल्पिक द्वंद्व

(b) द्विगू

(c) अव्ययीभाव

(d) तत्पुरुष

**4.** खालील उतारा वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांच्या अचूक पर्याय निवडा. (कोणतेही पाच) *5*

माझ्या खाजगी उपोषणाची हकीकत चाळीत जाहीर झाली आणि येताजाता ही माझी 'नाही ती भानगड' आहे, उगीच 'हात दाखवून अवलक्षण' आहे, 'पेललं नाही तेव्हा खाजगी झालं !' अशी वाक्ये माझ्या कानांवर येऊ लागली, पण मी कोणत्याही टीकेला भीक घालणार नव्हतो ! एकशे एक्क्याऐंशी पौंड : रात्रंदिवस ते कार्ड माझ्या डोळ्यांपुढे नाचत होते. वजन कमी झाले पाहिजे, या विचाराने माझी झोप उडाली. झोप कमी झाली तर वजन उतरते या विचाराने मला त्याचे ही काही वाटत नव्हते. मी पूर्वीसारखा गाढ झोपत नाही यावर धर्मपत्नीचा मात्र अजिबात विश्वास नव्हता. 'घोरत तर असता रात्रभर !' अशासारखी दुरूत्तरे ती मला करत असे.

"दोन महिन्यात पन्नास पौंड वजन कमी करून दाखवीन तर खरा !" अशी भीष्म प्रतिज्ञा करून मी आहारशास्त्रावरच्या पुस्तकात डोके घालू लागलो. प्रोटीनयुक्त पदार्थ, चरबीयुक्त द्रव्ये वगैरे शब्दांबद्दलची माझी आस्था वाढू लागली. साऱ्या ताटांतले पदार्थ मला न दिसता नुसत्या 'कॅलरीज' मला दिसू लागल्या.

(i) लेखकाची कोणती गोष्ट चाळीत जाहीर झाली ?

- (a) पगार वाढ झाल्याची
- (b) प्रमोशन मिळाल्याची
- (c) खाजगी उपोषणाची
- (d) पगार कपात झाल्याची

(ii) लेखकाचे वजन किती झाले होते ?

- (a) एकशे नव्वद पौंड
- (b) एकशे एक्क्याऐंशी पौंड
- (c) दोनशे एक पौंड
- (d) शंभर पौंड

(iii) लेखकाच्या धर्मपत्नीचा कोणत्या गोष्टीवर अजिबात विश्वास नव्हता ?

- (a) लेखक उपोषण करतील
- (b) लेखकाचे वजन खूप वाढले आहे
- (c) लेखक पूर्वीसारखे गाढ झोपत नाही
- (d) लेखक स्वप्नाळू नाहीत

(iv) लेखक कोणती पुस्तके वाचू लागला ?

(a) पदार्थशास्त्र

(b) आहारशास्त्र

(c) पाकशास्त्र

(d) व्यायामशास्त्र

(v) उपोषण सुरू केल्यामुळे लेखकाला ताटामध्ये काय दिसू लागले ?

(a) पक्वान्ने

(b) चमचमीत पदार्थ

(c) कॅलरीज

(d) पौंड

(vi) 'भीक न घालणे' या वाक्प्रचाराचा अर्थ —

(a) भिकाऱ्याला काहीही न देणे

(b) पर्वा न करणे

(c) भिक्षा न वाढणे

(d) भिक्षा घेणे

**5.** खालील कविता वाचून त्यावर आधारित प्रश्नांच्या उत्तरांचा अचूक पर्याय निवडा. (कोणतेही पाच) *5*

नाही मुठीमध्ये द्रव्य नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावे कळेना नाही कष्टाचे सामर्थ्य,
जीव ओवाळावा तरी जीव किती हा लहान,
तुझ्या शौर्यगाथे पुढे त्याची केवढीशी शान,
वर घोंघावे बंबारा, पुढे कललोळ धुराचे,
धडधडत्या तोफांतून, तुझे पाऊल जिद्दीचे।

(i) कवयित्रीच्या मुठीमध्ये काय नाही ?

(a) ताकद

(b) द्रव्य

(c) खाऊ

(d) धूर

(ii) कवयित्रीकडे कोणते सामर्थ्य नाही ?

(a) शक्ति

(b) पैसा

(c) कष्ट

(d) कल्लोळ

(iii) स्वतःच्या जीवापेक्षा कोणती गोष्ट कवयित्रीला महान वाटते ?

(a) लढाई

(b) धडधडत्या तोफा

(c) सैनिकाची शौर्यगाथा

(d) ओवाळणे

(iv) कल्लोळ कशाचे आहेत ?

(a) धुराचे

(b) पाण्यांचे

(c) धुळीचे

(d) ढगाचे

(v) सैनिकाचे पाऊल कसे आहे ?

(a) पराक्रमाचे

(b) जिद्दीचे

(c) देशभक्तीचे

(d) धुराचे

(vi) कवयित्री मनामध्ये सैनिकाबद्दल कोणती भावना आहे ?

(a) दुःख

(b) सहानुभूती

(c) अभिमान

(d) संकोच

## SECTION B

**6.** (a) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन) *3*

(i) डॉ. माशेलकर यांचे बालपण कोणत्या गावात गेले ?

(ii) सर्वानुमते पंतांनी वजन कमी करण्यासाठी कोणत्या व्यायाम करावा, असे ठरले ?

(iii) साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानाचा पुरस्कार कोणता आहे ?

(iv) निरंजनने धावत जाऊन स्टेशन मास्तरांना काय सांगितले ?

(v) अब्दुल तपोवनामध्ये कोणत्या दिवशी जात असे ?

(b) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. (कोणतेही तीन) *3*

(i) शालींच्या वर्षावाखाली कविवर्य नारायण सुर्वे यांची ________ कधीच हरवली नाही.

(ii) 'प्रमोशन' मिळाल्या बद्दल ________ यांनी सेक्शनला पार्टी दिली.

(iii) कवितेला संगीतकाराने स्वरसाज चढविला की तिचे ________ होते.

(iv) नाही रे बाळा, तू ________ नागरिक आहेस.

(v) अब्दुल तपोवनातील स्त्रीयांना ________ वाटे.

(c) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही एक) *3*

(i) शालीच्या संदर्भातील वाई येथील कोणती घटना लेखकाने सांगितली आहे ?

(ii) निरंजनने विद्यार्थी जीवन तुमच्या शब्दांत लिहा.

(iii) तपोवनाबद्दलच्या कोणत्या विचारांमुळे अब्दुल उदास झाला होता ?

**7.** (a) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा. (कोणतेही तीन) *3*

(i) कवी नारायण सुर्वे दुनियेच्या शाळेत काय शिकले ?

(ii) संत नामदेवांनी स्वतःची तुलना कोणाकोणाशी केली आहे ?

(iii) नारायण सुर्वे यांनी हरघडी कोणाचा विचार केला ?

(iv) सैनिकांना औक्षण कोण करते ?

(v) स्वप्न साकार करण्यासाठी कोणत्या मंत्राची आवश्यकता आहे ?

(b) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. (कोणतेही तीन) 3

(i) नामा म्हणे मेघा जैसा । विनवितो ________ तैसा ॥

(ii) ________ चंद्र शोधण्यातच जिंदगी बरबाद झाली.

(iii) घराघरातून जन्म घेतसे ________ नवा अवतार.

(iv) ________ हसतो श्रावण.

(v) तैसा धावे माझिया काजा ! ________ मी दास तुझा.

(c) खालीलपैकी कोणत्याही एकाचे संदर्भासह स्पष्टीकरण करा. 3

(i) दोन दिवस वाट पहाण्यात गेले; दोन दुःखात गेले
हिशोब करतो आहे किती राहिले डोईवर उन्हाले

(ii) हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट

**8.** खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) 2

(i) व्युत्पत्ती सांगणे म्हणजे काय ?

(ii) डॉ. काकोडकरांनी सांगितलेले अनुभव त्यांना कोठे आले होते ?

(iii) डॉ. होमी भाभांचे व्यक्तिमत्व कसे होते ?

**9.** (i) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्यांच्या आधारे निबंध लिहा. 8

(a) माझा आवडता ऋतु

मुद्दे – प्रस्तावना – एकूण ऋतु – आवडत्या ऋतूचे वर्णन – कारणे – अनुभव व आनंद.

(b) मी देशाचा आरोग्यमंत्री झालो तर/झाले तर...

मुद्दे – प्रस्तावना – देशातील आरोग्याची स्थिती – अनारोग्याची कारणे – उपाय.

(c) एका वृक्षाचे मनोगत

मुद्दे – पूर्वीचा निसर्ग – झाडे – आवश्यकता व उपभोग – आज जंगलतोड – यातनामय जीवन – वातावरणावरील परिणाम – सावधानतेचा इशारा.

(ii) खालील मुद्यांचा आधारे गोष्ट लिहा व गोष्टीला योग्य शीर्षक देऊन तात्पर्य लिहा. (कोणतेही एक) 7

(a) मुद्दे – श्रीमंत माणूस – घरातील पैशाची चोरी – नोकरावर संशय – सर्व नोकरांना समान लांबीच्या काठ्यारात्री देतो – चोराच्या काठीची उंची कमी होईल – चोर रात्री काठी कापून ठेवतो – सकाळी काठ्या तपासतो – चोर पकडला जातो.

**अथवा**

(b) मुद्दे – शेतकरी कोंबडी विकत घेतो – दुसऱ्या दिवसी कोंबडी सोन्याचे अंडे देते – रोज देऊ लागते – शेतकऱ्याला लोभ – कोंबडीच्या पोटातील सगळी अंडी एकदमच घ्यावीत – कोंबडीला मारतो – पश्चाताप

(iii) खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्र लिहा. 5

(a) तुम्ही दक्षिण भारताच्या सहलीला जाण्यासाठी पर्यटन कंपनीकडून माहिती मागविणारे पत्र लिहा.

**अथवा**

(b) विजेचे बील चुकीचे येत असल्याबद्दल तक्रार करणारे पत्र वीजमंडळाच्या अधिकाऱ्यास लिहा.